# ब्रह्माकुमारीज संस्था महिलांचा आत्मविश्वास वाढविणारे विद्यापीठ - ज्योती दिदी



**महिला दिनानिमित्त कार्यक्रम**

रिसोड/तालुका प्रतिनिधी:- प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय रिसोड येथे ८ मार्च जागतिक महिला दिनाचा कार्यक्रम घेण्यात आला कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ब्रह्मकुमारीज सेवा केंद्र रिसोड च्या संचालिका राजू गिनी ब्रह्मा कुमारी ज्योती दीदी तर प्रमुख अतिथी म्हणून विजय माला असं कर नगराध्यक्ष नगर परिषद रिसोड काव्या घोल्प तालुका कृषी अधिकारी शिल्पा सुरगड पोलीस उपनिरीक्षक किरण ताई दुबे मुख्याध्यापिका भारत प्राथमिक मराठी शाळा शुभांगी वाटाणे गृहशास्त्र विभाग कृषी विज्ञान केंद्र करडा इत्यादी मान्यवर उपस्थित होते सर्वप्रथम सर्व मान्यवरांचा विद्यालयाच्या वतीने सन्मान करण्यात आला ब्रह्मकुमारीस विद्यालयाचा परिचय देऊन महिलांप्रती ब्रह्मकुमारी संस्थेचे योगदान स्पष्ट करण्यात आले.प्रसंगी मान्यवरांनी मनोगत व्यक्त करताना महिलांचा गुणगौरव केला आजची महिला स्वतःला सिद्ध करण्यासाठी कोणतीही कसर न ठेवता सर्व क्षेत्रामध्ये महिला आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवित आहेत व्यापार उद्योग, कृषी.विज्ञान, अध्यात्म, शिक्षण,समाजसेवा,राजकारण इत्यादी क्षेत्रात अतिशय प्रामाणिक व विश्वासपूर्ण कार्य करीत आहेत.

समाजाची प्रगती साधावयाची असेल तर महिलांचा मान सन्मान केवळ एका दिवसापूरता सीमित न ठेवता नेहमीच महिलांना मानसन्मान व्हावा असे मनोगत मान्यवरांनी व्यक्त केले. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करतांना दीदींनी ब्रह्माकुमारीज विद्यालयात महिलांचा सन्मान हा महिलांचा आत्मविश्वास वृद्धिंगत करण्यासाठी त्यांच्या कार्याला प्रोत्साहित करण्यासाठी आणि विश्वातील सर्व महिलांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी सन्मान केला जातो.स्वातंत्र्यपूर्व काळापासून ब्रह्माकुमारीज संस्था महिलांचा आत्मविश्वास वाढविणारे विद्यापिठ असल्याचे प्रतिपादन दीदींनी केले.मनुष्य आत्म्यांमध्ये दैवी गुणांचा अंतर्भाव करण्याचे ज्ञान या विद्यालयातून दिले जाते. आत्मिक सुख ,शांती,प्रेम,आनंद या गुणांना आत्मसात करण्याचे ज्ञान ब्रह्माकुमारीज सातत्याने देत आहे. प्रसंगी दीदींनी मान्यवरांसह सर्व उपस्थितांना विद्यालयाचा सात दिवसाचा मूलभूत कोर्स करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन ब्रह्माकुमारी गीता दीदींनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ब्रह्माकुमारी वंदना दिदी सह विद्यालयाच्या ज्ञानार्थी मातांनी विशेष सहकार्य केले.

Scanned with CamScanner